खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय  वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) ‘साहित्यरंग’ पाठ्यपुस्तक

# लेख ५) कोरडी भिक्षा  : श्रीनिवास विनायक कुलकर्णी

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल  :  dr.sdshinde80@gmail.com    भ्रमणध्वनी क्र. :  9604309060

## 'साहित्यारंग' पाठ्यपुस्तक

# लेख ५) कोरडी भिक्षा : श्रीनिवास विनायक कुलकर्णी

### लेखक परिचय :

मराठी साहित्यातील महत्त्वाचे **ललितलेखक.** त्यांचे अनेक ललितलेख **'मौज' आणि 'सत्यकथा'** या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. त्यांनी **'डोह', 'पाण्याचे पंख', 'सोन्याचा पिंपळ', 'कोरडी भिक्षा' (ललित लेख)** आदी ग्रंथांचे लेखन केले आहे. **त्यांचे लेखन अनुभवाला कोणतेही मुरड न घालता, वळण न देता, त्याच्या मूलरूपाची, कोवळ्या ताजेपणाची जपणूक करणारे आहे. 'मी' चे वेगळेपण, पंचेंद्रियांना आवाहन करणाऱ्या संवेदना व पंचमहाभूतांचा आविष्कार, भाषिक समृद्धी हे त्यांच्या लेखनाचे खास विशेष आहेत.**

## लेखाचा आशय :

'कोरडी भिक्षा' हा श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचा लेख आहे. **बालपणी आश्रमात राहून शिक्षण घेतलेल्या लेखकाची आठवण या लेखातून व्यक्त झाली आहे.**

लेखक शिक्षणासाठी आश्रमात राहत असल्याने त्यांना रोज **माधुकरी (शिजवलेल्या अन्नाची भिक्षा) आणि दर रविवारी कोरडी भिक्षा** मागावी लागत असे. **शिदोरे अ, शिदोरे ब, गावभाग, मारवाडपेठ, राधा एक्सटेन्शन, पंचमुखी मारुती, वखारभाग** असे भिक्षा मागायचे विभाग असत. काही राखीव असे खास विभागही **मुलांमधल्या पदाधिकाऱ्यांच्या** वाट्याला येत. प्रत्येक विभागातील भिक्षा किती गोळा होते याचा व्यवस्थापकांकडे ठोकताळा असायचा. त्यामुळे मुलांना प्रामाणिकपणे भिक्षा जमावी करावी लागत असे.

भिक्षा मागण्यासाठी दोन मुलांची जोडी असायची. भिक्षेकरी मुलाच्या **झोळीला** विविध धनधान्यांसाठी अनेक कप्पे असायचे. तर जोडीदाराकडे **रोख रकमेसाठी लाकडी पेटी** असे. पेटीला कुलूप. सीलबंद. दानकरी थेट पेटीत पैसे टाकीत. पैशाची पेटी असणाऱ्या मुलाकडे दुसरी लहान झोळी असायची. ती पिठासाठी.



SANJAY MAR HRM

**गिरी नावाचा विद्यार्थी सेक्रेटरी** आणि **लेखक वाकनीस** होते. गिरी लेखकाच्या विचाराने कोरड्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करीत असे.

मारवाडपेठ हा जो भिक्षा मागण्याचा विभाग होता; तेथे **गोविंद शांताराम** यांचं घर होतं. ऐश्वर्यसंपन्न घरात हवी तेवढी भिक्षा, चकचकीत नाणी आणि पोटभर चविष्ट तुपातले गोड पदार्थ खायला मिळायचे. मारवाडपेठेबरोबरच **वखारभागातही पृथ्वीराज मालू** यांचे घर होतं. त्या घरातल्या आजही मायेने खाऊ घालायच्या. मोहरीच्या तेलाचे लोणचे द्यायच्या. त्याची चव लेखकाच्या जिभेवर आठवडाभर तरी रेगांळायची. याच वखार भागात **'आशाराणी'** यांचं दुमजली सुखवस्तू घर होतं. या घरातील आजी लेखक व त्याचा मित्र गिरीला प्रेमाने केळी-दूध खायला द्यायच्या. झोळीत तांदूळ, पेटीत नाणी टाकायच्या. **इतरत्र पोटभर खाण्यापेक्षा त्यांच्याकडच्या दूध-केळ्यांनी, आजीच्या आवाजाने लेखकाला वेगळे समाधान मिळायचे.** त्या लेखकाला प्रत्येक वेळी **नवनवीन श्लोक म्हणायला** सांगायच्या. त्यांनी लेखकाला दोन पैसे मिळतील म्हणून **तांदूळ निवडायचं काम** दिलं. लेखकाच्या तांदूळ निवडीवर आजी खुश व्हायचा. **'तांदळातील खडा वेचता आला, तर आपल्यातला कुठलाही दोष तसाच वेचून तुम्हाला फेकता येईल' असा त्या उपदेश करायच्या.**

तांदूळ निवडायचे काम चालू असताना आशाराणींच्या आईंनी लेखकाला **स्तोत्र** लिहायला सांगितले. लेखकाचे वळणदार अक्षर पाहून त्या आनंदल्या. त्यांनी डॉक्टर असणाऱ्या आशाराणीला ते उत्सुकतेने दाखवले. त्यांनीही लेखकाचे कौतुक केले. लेखकाला एका चांगल्या घराशी संबंध आल्याचा आनंद अधिक होता.

लेखकाचे आश्रमातील शेवटचे वर्ष होते. फॉर्म-फी भरण्यासाठी त्यांना पैसे हवे होते. गिरीसोबत लेखकाने **आशाराणींच्या आईकडून** पैसे घेतले. त्यांनी चांगला अभ्यास करा, असा आशीर्वाद दिला. गिरीने मात्र **आशाराणीच्या दवाखान्यात जाऊन त्यांच्याकडूनही फॉर्म-फीचे पुन्हा पैसे घेतले.** गिरीच्या या वागण्याचा लेखकाला धक्का बसला. **दोघींकडूनही फॉर्म- फी साठी पैसे घेऊन आपण त्या दोघींनाही फसवल्याची भावना लेखकाच्या मनाला छळू लागली.**

आशाराणींच्या आईच्या निर्मळपणाने, मायेने लेखक भरून गेलेले होते. त्यांना काय वाटेल हे कळलं तर ? हा विचार लेखकाला छळू लागला. **स्वतःच्या खोटेपणाने त्यांना वेढून टाकलं होतं.** परीक्षा संपल्या. त्यांनी



SANJAY MAR HRM

आश्रम सोडला. **आशाराणीचे पैसे परत करावेत असं लेखकाच्या पुन्हा पुन्हा मनात येत राहिले. पण त्यांना, त्यांच्या आईंना पुन्हा भेटण्याचे धाडस कधी झालं नाही.**

## या लेखाचे विशेष :

'कोरडी भिक्षा' या लेखातून श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांनी आश्रमातील आठवणींना उजाळा दिला आहे. आश्रमामध्ये विद्यार्थ्यांनी रोज माधुकरी (शिजविलेल्या अन्नाची भिक्षा) आणि रविवारी 'कोरडी भिक्षा' मागायची असा नित्यक्रम असतो. लेखक मित्रासोबत कोरड्या भिक्षेला जायचे. ते निष्ठेने आणि सचोटीने भिक्षा मागायचे. जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे सोपविलेले काम करायचे. अखेरीस सोबतचा मित्र एकाच घरातील दोन व्यक्तींकडून परीक्षा फी चे पैसे उकळतो. दोघे मित्र परीक्षा देतात; पण लेखकाला या फसवणुकीतील मूक सहभाग अस्वस्थ करतो.

**लेखकाचा बालपणातील हा आत्मपर अनुभव आत्मचिंतनाच्या वळणाने जातो. या आठवणींमध्ये भिन्न स्वभाव आणि प्रकृतीचे मित्र, प्रसंगवर्णने, त्यातून प्रकट होणाऱ्या रूप, रंग, रस, गंध, दृक आदी संवेदना प्रकट होतात. या आत्माविष्कारातून सत्-असत्, नैतिक-अनैतिक, मूल्यात्मकता-मूल्यविहीनता अशा द्वंद्वातून एक मूल्यभान येते. ते प्रगल्भ जीवन अनुभवाचा प्रत्यय देणारे आहे.**

---

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे ,**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MAR HRM